फौजदारी किरकोळ अर्ज. **<u>२७५/२०२४</u>**
राणी विरूद्ध अतुल व इतर
**निशाणी २० खाली**

**<u>अर्जदार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ पुष्पा वासुदेवराव दामधर हिची उर्वरित सरतपासणी शपथेवर सुरू</u> — <u>अर्जदारतर्फे ॲड. श्री. एस. एस. खंडेराव यांचे मार्फत</u>**

प्रस्तुत प्रकरणी मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी २० वर दाखल केले असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर मजकुर माझे सांगण्यानुसार टंकलिखीत करण्यात आलेला आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — गैरअर्जदारांतर्फे विधिज्ञ श्रीमती. आर. आर. सांगोळे यांचेमार्फत.**

२. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराचे गैरअर्जदार क्र. १ सोबतचे लग्न आम्हाला झेपेल तेवढ्याच खर्चाने आम्ही केले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. २ यांत नमुद दागिने गैरअर्जदार यांनी वधुला करून दिलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर दागिने विकत घेण्यासाठी अर्धे पैसे आम्ही दिले होते व अर्धे पैसे गैरअर्जदार यांनी दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदाराचे लग्न झाले त्यावेळी गैरअर्जदार क्र. ३ हिचे लग्न झालेले होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. ३ हिचे अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ व २ यांचेकडे येणे जाणे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार घरात वाद घालत असल्यामुळे गैरअर्जदार क्र. १ याला दारूचे व्यसन जडले होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र. १ हा दारू पिउन अर्जदार हिला मारहाण करित असे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा कुठलेही कारण नसतांना जबरदस्तीने अवैधरित्या गर्भपात घडवुन आणला हे मी खोटे सांगत आहे.

३. अर्जदार दि. १४/०२/२०२२ पासुन माहेरी राहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर अर्जदार सासरी गेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दि. १४/०२/२०२२ रोजी अर्जदाराने माझे पतीला फोन केला होता. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराने गैरअर्जदारांशी वाद घातला व स्वत:हुन माहेरी निघुन आली. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही माझे पतीसोबत स्वत:हुन माहेरी निघुन आली. अर्जदार क्र. २ ही दोन महिन्यांची झाल्यानंतर अर्जदार क्र. १ गैरअर्जदारांकडे नांदायला गेली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदारांच्या सासरी कधीही जात नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/०२/२०२४ रोजी अर्जदार क्र. १ ला गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी मारले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. १४/०२/२०२२ रोजी अर्जदार माहेरी आली तेव्हा सर्व दाग—दागिने सोबत घेउन आली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८/०२/२०२४ रोजी अर्जदार क्र. १ माहेरी आली तेव्हा तिच्या अंगावर दाग—दागिने होते.

प्र.१. गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ हिच्या अंगावरील दाग—दागिने काढुन घेतले किंवा कसे हे तुम्ही तेथे हजर नसल्यामुळे तुम्हाला सांगता येणार नाही ?

उ. माझी मुलगी घरी आली तेव्हा तिच्या गळ्यात फक्त काळ्या मन्यांची पोत होती.

प्र.२. दि. २८/०२/२०२४ रोजी गैरअर्जदार यांनी तुमच्या मुलीच्या अंगावरील दागिने पुन्हा काढुन घेतले का ?

उ. माझे मुलीच्या अंगावर काहीच नव्हते. त्यामुळे माझे दागिने मी तिला दिले होते व ते देखील त्यांनी दि. २८/०२/२०२४ रोजी काढुन घेतले.

४. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०६/०४/२०२४ रोजी सकाळी १०:०० वाजता गैरअर्जदार क्र. १ आमच्या घरी आला तेव्हा मी शेतात होते.हे म्हणणे खरे नाही की, मी शेतात असल्यामुळे मला

दि. ०६/०४/२०२४ रोजीच्या घटनेबाबत काहीच माहिती नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, मला अर्जदार क्र. १ ने सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, दोन एकर शेत आमच्या मुलीच्या नावाने केले तरच मुलीला नांदायला पाठवु असे माझे पती म्हणाले होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गैरअर्जदार क्र. १ याला अर्जदार क्र. २ हिस भेटु देत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गैरअर्जदार क्र. १ याला गैरअर्जदार क्र. २ हिला भेटु देत नव्हतो म्हणुन त्याला दारूचे व्यसन लागले.

प्र. तुमच्या मुलीला दोन एकर शेत पाहिजे म्हणुन तुम्ही दर्यापुर कोर्टात केस दाखल केली आहे ?

उ. होय, माझे नातीला शेत पाहिजे. त्याच्यामुळे केस केली आहे.

५. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये आधीपासुन वाद दोन एकर शेताच्या कारणावरून होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार हे अर्जदाराला नांदवायला तयार होते व आम्ही तिला नांदवायला पाठवत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्ष माझे मुलीच्या सांगण्यावरून देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १५.१२.२०२५ (ए.ए. माळी)

अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

(न्यायालय क्र. २)

अकोट, ता. आकोट, जि. अकोला.